**<u>नि.क्र.१६/ड</u>** (१) नियमीत दिवाणी दावा क्रमांक ८८/२०१८
एम एच आर जी ०९००६६२२०१८ सौ. सुजाता भास्कर घाग विरूद्ध वामन ढुमणे

## <u>आदेश आयोग नेमणूक अर्ज निशाणी क्रमांक १६ वर</u>

(पारीत केल्याचा दिनांक **२०.०४.२०१९**)

**०१)** प्रस्तुत अर्ज वादीने ***<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम २६ नियम ०१</u>*** नुसार अतिक्रमण दूर करून खुला ताबा मिळण्याच्या दाव्यामध्ये मेहरबान उप-अधिक्षक भूमि अभिलेख, रोहा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून आयोग नेमून मौजे उसर, तालुका रोहा येथील गट क्रमांक ८७ क्षेत्र हेक्टर ०१.८३.० आर आकार रक्कम रूपये २.३३ पैसे या वाद मिळकतीची मोजणी करून मोजणी नकाशा आणि अहवाल दाखल करण्यासाठी न्यायालयीन आयोग नेमणूक होण्यासाठी केला आहे.

**०२)** वादीचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, प्रतिवादीने दावा मिळकतीवर अतिक्रमण करून घराचे बांधकाम केले आहे. म्हणून वादीने मोजणी करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त आयोग नेमण्याची विनंती केली.

**०३)** प्रतिवादीने म्हणणे **<u>नि.क्र.१८</u>** दाखल करून अर्जास जोरदार हरकत घेतली आहे. वादीने पुरावा गोळा करण्याच्या हेतूने अर्ज दिला आहे म्हणून अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

**०४)** वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. पी. दांडेकर यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादीने वाद मिळकतीत बेकायदेशीर अतिक्रमीत बांधकाम केले आहे. वाद मिळकत वादीची मालकी व ताबे कब्जा वहिवाटीची आहे. प्रतिवादीचा वाद मिळकतीशी कोणताही संबंध नाही.

०५) प्रतिवादीतर्फे श्री. आर. बी. सावंत यांनी असा युक्तिवाद केला की, वादीने पुरावा गोळा करण्याच्या हेतूने अर्ज दिला आहे. म्हणून प्रतिवादीने वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०६) अतिक्रमण दूर करण्याच्या दाव्यात उभयतांना मान्य नकाशा किंवा आयोगाचा अहवाल व नकाशा अटळ आहे. वादीने वाद मिळकतीची मोजणी होवून नकाशा व अहवाल मिळवण्याची मागणी केली आहे. वादी प्रतिवादीचा वाद मिळकतीबाबत वाद आहे असे दिसते. म्हणून तज्ञाची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करून मोजणी करुन नकाशा व अहवाल प्राप्त केल्याशिवाय वाद संपणार नाही.

०७) म्हणून उप-अधिक्षक भूमी अभिलेख, रोहा यांची न्यायालयीन आयुक्त अशी नेमणूक वादीने आयोगाचा खर्च देण्याच्या अटीवर वादाचे पुर्ण निराकरण करण्यासाठी अहवाल व नकाशा दाखल करण्यासाठी करणे न्यायाचे होईल.

०८) उभयतांना त्यांच्या मालकी हक्काच्या दस्तऐवजासह ते ज्या महसूल किंवा ईतर कागदपत्रांवर भरवसा ठेवतात अशा कागदपत्रांच्या दोन प्रमाणीत / सत्य प्रती एक न्यायालयासाठी व एक न्यायालयीन आयुक्ताला देण्यासाठी व एक छायांकीत प्रत विरुद्ध पक्षाला देण्यासाठी दाखल करण्याचा आदेश देणे उचित होईल. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

०१. वादीचा अर्ज **नि.क्र.१६** मंजूर करण्यात येतो.

०२. ***<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम २६ नियम ०९ सह वाचनीय कलम ७५(ब)</u>*** नुसार उप-अधिक्षक भूमि अभिलेख, रोहा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून मौजे उसर, तालुका रोहा येथील गट क्रमांक ८७ क्षेत्र हेक्टर ०१.८३.० आर आकार रक्कम रूपये २.३३ पैसे या वाद मिळकतीचे निरीक्षण करून आयोगपत्र मिळाल्यापासून दोन महिन्याच्या आत नकाशा काढून नकाशा व अहवाल दाखल करण्यासाठी नेमणूक करण्यात येते.

०३. वादीने उप-अधिक्षक भूमि अभिलेख, रोहा यांच्या कार्यालयात त्यांच्या सुचनेनुसार आवश्यक शुल्क नियमाप्रमाणे अदा करावे व आयोगपत्र विनाविलंब जारी करण्यासाठी शुल्क पावतीची सत्य प्रत अभिलेखावर दाखल करावी.

०४. वादी व प्रतिवादीला ते ज्या मालकी हक्क दस्तऐवज व महसूल किंवा ईतर कागदपत्रांवर भरवसा ठेवतात अशा कागदपत्रांच्या दोन प्रमाणीत / सत्य प्रती व एक छायांकीत प्रत दाखल करण्याचा निर्देश देण्यात येतो.

०५. न्यायालयीन आयुक्ताला ***<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८</u>*** चे कलम ७५ ते ७८, क्रम २६ व अंतर्गत नियम तसेच दिवाणी नियमावलीतील प्रकरण क्रमांक ०८ परिच्छेद क्रमांक १५१ ते १७० व महसूल नियमावलीतील आवश्यक नियमांचा अवलंब करून आयोगाचे कार्य सत्वर पुर्ण करण्याचे व मोजणी नकाशा व अहवाल दाखल करण्याचे निर्देशीत करण्यात येते. आयोगाचे काम काही अपरिहार्य कारणामुळे उपरोक्त ठरवून दिलेल्या मुदतीत पुर्ण होवू शकले नाही तर न्यायालयीन आयुक्त उपरोक्त मुदत संपण्यापुर्वी न्यायालयाकडे लेखी अर्ज करून मुदत वाढ मागु शकतात.

**०६.** उभय पक्षांना जातीने अथवा विधीज्ञांमार्फत न्यायालयीन आयुक्ताने नेमलेल्या तारखेला व वेळी हजर राहण्याचे निर्देशीत करण्यात येते.

**०७.** न्यायालयीन आयुक्ताला उभय पक्षांना आयोगाच्या ठरलेल्या दिवस, तारीख व वेळेची सुचना वादपत्राच्या सरनाम्यातील पत्त्यांवर नोटीसा काढून कळवण्याबाबत निर्देशीत करण्यात येते. वादीला वादपत्र व कैफियतीच्या प्रमाणीत प्रती न्यायालयीन आयुक्ताला आयोगाचे स्वरूप व हेतूचे आकलन होण्यासाठी देण्याचे निर्देशीत करण्यात येते.

**०८.** जर आयोगाच्या ठरलेल्या दिवशी, तारखेला व वेळी कोणताही पक्ष गैरहजर राहिल्यास न्यायालयीन आयुक्ताने तसा पंचनामा करून आयोगाचे कार्य उपस्थित पक्षकारासमक्ष पुर्ण करावे.

**०९.** वादीने आदेश कलम ०३,०४ व ०७ ची पुर्तता तात्काळ करावी.

**१०.** अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात येतो.

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष लक्ष्मण फुले)**
**(एम्. एच्. आर. जी. ०००९-२१२५)**
**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**जिल्हा रायगड.**

**स्थळ : रोहा.**
**दिनांक : २०.०४.२०१९.**